दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार दि.२२ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

### मविआ,महायुतीला तगडं आव्हान
# परिवर्तन महाशक्ती आघाडीकडून १० उमेदवारांची पहिली यादी जाहीर

**मुंबई (वृत्तसंस्था)**
राज्यातील विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यादृष्टीने सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून उमेदवारांची घोषणा केली जात आहे. रविवारी भाजपाने ९९ जागांसाठी त्यांच्या उमेदवारांची घोषणा केली होती. त्यानंतर आज किंवा उद्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यापूर्वी आज परिवर्तन महाशक्ती आघाडीने १० जागांसाठी त्यांच्या उमेदवारांची घोषणा केली आहे. आज झालेल्या पत्रकार परिषदेत राजू शेट्टी यांनी यासंदर्भात माहिती दिली.राजू शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, परिवर्तन महाशक्ती आघाडीने आज १० उमेदवारांची नावे जाहीर केली आहे. यापैकी चार जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर दोन जागा महाराष्ट्र स्वराज्य पक्षाला, एक जागा महाराष्ट्र राज्य समिती, तर एक जागा स्वतंत्र भारत पक्षाला देण्यात आली आहे. राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेलाही दोन जागा देण्यात आल्या आहेत. मात्र, या जागांसाठी अद्याप नावांची घोषणा झालेली नाही.परिवर्तन महाशक्ती आघाडीने अचलपूरमधून बच्चू कडू यांना उमेदवारी दिली आहे. तर रावेरमधून अनिल चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच चांदवड विधानसभा मतदारसंघातून गणेश निंबाळकर, देगलूर बिलोलीमधून सुभाष सामने, ऐरोलीमधून अंकुश कदम, हदगाव हिमायतनगरमधून माधव देवसरकर, हिंगोलीमधून गोविंदराव भवर, राजुरामधून वामनराव चटप यांनी उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय शिरोळ आणि मिरज या दोन जागां स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. पण उदेवारांच्या नावाची घोषणा झालेली नाही.दरम्यान, या पत्रकार परिषदेला संभाजीराजे छत्रपती आणि बच्चू कडूदेखील उपस्थित होते. यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले, परिवर्तन महाशक्ती आघाडी विधानसभा निवडणूक लढवणार ही नाही, असे अनेकांना वाटत होते. पण आता आम्ही नावे जाहीर करत आहोत. आम्ही इतर पक्षांसारखे वेगवेगळे नावे जाहीर न करता एकत्र केली आहे. भविष्यात महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. त्यातील एक पक्ष फुटून बाहेर निघणार आहे. तर महायुतीतील एक मित्र बाहेर जाणार असल्याची माहिती आमच्यापर्यंत आली आहे.आजपर्यंत राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोघांनीही सत्ता भोगली आहे. मात्र आजही आपण केवळ मूलभूत प्रश्नांवरच चर्चा करत आहोत. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राकडे विकासाची दूरदृष्टी बघायला मिळत नाही. त्यामुळेच आम्ही परिवर्तन महाशक्ती आघाडीची स्थापना केली आहे. आमच्या या आघाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आज आम्ही १० जांगासाठी उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र, लवकरच आम्ही आणखी काही उमेदवारांची नाव जाहीर करू, अशी प्रतिक्रिया संभाजीराजे छत्रपती यांनी दिली.



## शेतकरी मित्र राजेंद्र मस्केंनी घेतली मनोज जरांगे पाटलांची भेट

**बीड । प्रतिनिधी**
शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज प्रथमच संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची अंतर्वली सराटी येथे भेट घेतली.
लोकसभा निवडणुकीत जिल्हाध्यक्ष पदाची धुरा संभाळत सामाजिक प्रतीकुल परिस्थितीत प्रचार यंत्रणा उभी केली.
भाजपाचा निसटता पराभव झाल्या नंतर पराभवाचे खापर मराठा समाजावर फोडून राजेंद्र मस्के यांच्या कामावर संशय व्यक्त केला.
अखेर काल राजेंद्र मस्के यांनी समर्थक व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन भारतीय जनता पार्टीचा त्याग करून जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. २०१९ पासून बीड



विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी राजेंद्र मस्के तयारी करत आहेत.आगामी बीड विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी पक्ष नेतृत्वाकडे मागणी केली होती. परंतु प्रतिसाद नसल्याने अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली. यापूर्वी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी केलेली आहे. पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर प्रथमच जरांगे पाटलांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

## डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या निर्णयाचे स्वागत-राजेंद्र आमटे
### बीडसह महाराष्ट्रात महविकास आघाडीला फायदा होणार

**बीड । प्रतिनिधी**
स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पत्नी डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी शरदचंद्र पवार साहेब यांच्या हस्ते व खासदार सुप्रियाताई सुळे, जयंत पाटील, मोहिते पाटील यांच्या उपस्थतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केला या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रवेशामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या सह महाविकास आघाडीला बीड मध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे साहेब यांच्या स्वच्छ प्रतिमा, तज्ञ प्रशासक व विनायकराव मेटे साहेब यांच्या कार्यकर्तृत्वाचा फायदा महविकस आघाडीला होणार आहे डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रवेशामुळे शिवसंग्राम कार्यकर्त्यात उत्साहाचे वातावरण आहे डॉ ज्योतीताई मेटे यांच्या निर्णयाचे शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, रमेश जगताप, कृष्णा मसुरे, संजय तीपाले, शैलेश सुरवसे, मोहन गव्हाणे, विलास शिरसट,सुधाकर काकडे यांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.



## संभाजीराजेंनी पुण्यात घेतल्या १५ इच्छुकांच्या मुलाखती:भाजप, दादा समर्थकांचाही समावेश

**पुणे (वृत्तसंस्था)**-आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती आणि मविआला शह देण्यासाठी छत्रपती संभाजीराजेंच्या पुढाकाराने परिवर्तन महाशक्ती ही तिसरी आघाडी स्थापन झाली आहे. त्यात संभाजीराजेंच्या स्वराज्य पक्षाकडून लढू इच्छिणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. संभाजीराजेंनी शनिवारी पुण्यात किमान १५ जणांच्या मुलाखती घेतल्या. त्यात अजितदादा, भाजप समर्थक पदाधिकाऱ्यांचाही समावेश आहे. स्वराज्य पक्षाच्या पुण्यातील शिवाजीनगर येथील मध्यवर्ती स्वराज्य भवन कार्यालयात मुलाखती घेताना पक्षाचे सरचिटणीस धनंजय जाधव, अप्पासाहेब कुढेकर, प्रशांत पाटणे, विनोद साबळेही उपस्थित होते. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नांदेडचे जिल्हाप्रमुख विश्वंभर पवार, नाशिकचे माजी महापौर दशरथ पाटील यांना मुलाखतीसाठी आलेले पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. सूत्रांनी सांगितले की, केवळ दशरथ पाटीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील तीन शहरांचे माजी महापौरही स्वराज्य पक्षाकडून लढण्यास इच्छुक आहेत. त्यांनी संभाजीराजेंची स्वतंत्र भेट घेतली.सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे लोकसभेत शरद पवार गटाला मोठे यश मिळाले असल्याने महायुतीतील अनेक जण तुतारी हातात घेत आहेत. त्या खालोखाल स्वराज्य पक्ष, परिवर्तन महाशक्तीकडे इच्छुकांचा ओढा आहे. भाजपचे दोन जिल्हा परिषद सदस्यपद व एक जिल्हा परिषद सभापती, शिंदेसेनेचे दोन जिल्हा परिषद सदस्य, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दोन जिल्हा परिषद सदस्य उमेदवारी मागण्यासाठी स्वराज्य भवनात आले होते.भूम-परंडा मतदारसंघातील सहकार क्षेत्रातील एक नेतेही स्वराज्यच्या वाटेवर आहेत.आम आदमी पक्षाच्या युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर यांनी तसेच पुणे जिल्ह्यातील खेड-राजगुरूनगर पंचायत समितीचे माजी सभापती अंकुश राक्षे यांनीही उमेदवारी मागण्यासाठी संभाजीराजेंची भेट घेतली.

## काँग्रेसची पहिली यादीही उद्याच येणार-नाना पटोले

**मुंबई (वृत्तसंस्था)**
काँग्रेसची महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीची पहिली यादी उद्या जाहीर होणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी दिली. महाविकास आघाडीचे जागावाटपही उद्याच होणार असल्याचे ते म्हणाले.निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आहे. त्यानुसार २० नोव्हेंबर रोजी राज्यातील २८८ जागांसाठी एकाच टप्प्यात निवडणूक होईल. त्यानंतर २३ तारखेला मतमोजणी होईल. तत्पूर्वी, महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा घोळ अद्याप संपला नाही. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काँग्रेस व मित्रपक्षाच्या १२ जागांवर दावा केल्यामुळे हा घोळ लांबला आहे. या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेस नेत्यांनी दिल्लीत धाव घेतली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोमवारी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना महाविकास आघाडीचे जागावाटप उद्या निकाली निघणार असल्याचा दावा केला आहे.नाना पटोले म्हणाले, विदर्भातील जागांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व काँग्रेसमध्ये कोणताही वाद नाही. माध्यमांनी उगीच आमच्यात भांडण लावू नये. मंगळवार सायंकाळपर्यंत महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे जागावाटप जाहीर होईल.

# भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**
भाजपच्या राष्ट्रीय सचिव, राजस्थानच्या सह प्रभारी श्रीमती विजया रहाटकर यांची प्रतिष्ठित व प्रभावी अशा राष्ट्रीय महिला आयोगाच्या (छउथ) अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही आपला ठसा उमटविला होता. त्यामुळे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने त्यांची नियुक्ती केली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या त्या पहिल्या मराठी व्यक्ती ठरल्या आहेत. त्यांना केंद्रीय राज्यमंत्री पदाचा असेल.
संवैधानिक दर्जा असणाऱ्या राष्ट्रीय महिला आयोगाला अत्यंत व्यापक अधिकार आहेत. महिलांच्या उन्नतीसाठी घटनात्मक आणि कायदेशीर मुद्दांचा फेरआढावा घेणे, संसदीय- वैधानिक शिफारशी करणे, महिलांविषयक धोरणात्मक बाबींसाठी केंद्र व राज्य सरकारांना सल्ला देणे, महिलांविषयक प्रश्नांचा संशोधन करणे, त्यांच्या अडीअडचणींची दखल घेऊन कारवाई करणे आदींचा त्यात प्रामुख्याने समावेश आहे. १९९२मध्ये विशेष कायद्यान्वये स्थापन झालेल्या या आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.
अत्यंत तळागाळापासून काम सुरू करून विविध राजकीय आणि सामाजिक जबाबदाऱ्या उत्तम पेलत विजयाताईंचे नेतृत्व विकसित होत गेले. प्रत्येक ठिकाणी समरसतेने काम करून आपल्या कौशल्याचा १००% लाभ त्या पदाला देऊन ती जबाबदारी सर्वोत्तम पार पाडणे हे विजयाताईंचे वैशिष्ट्य राहिले आहे. महाराष्ट्र भाजप युवा मोर्च्याच्या उपाध्यक्ष ते भाजप महिला मोर्च्याच्या राष्ट्रीय अध्यक्ष आणि आता भाजपच्या राष्ट्रीय सचिव असा त्यांचा प्रवास राहिलेला आहे. त्या भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या प्रदीर्घकाळ सदस्यादेखील राहिल्या आहेत. सध्या त्या राजस्थान भाजपच्या सहप्रभारी म्हणून पक्षाचे काम करीत आहेत. राजस्थान विधानसभेमध्ये भाजपने मिळविलेल्या यशामध्ये त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे.
भाजप महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्ष असतानाच त्यांची महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणून नियुक्ती (२०१६ ते २०२१) झाली होती. महिला



आयोगाच्या अध्यक्ष म्हणून विजयाताईंनी सक्षमा, प्रज्ज्वला, सुहिता यांसारखे महिला केंद्रित कितीतरी उपक्रम राबविले. सक्षमा उपक्रमा मधून ॲसिड हल्ला पीडितांना दिलासा दिला. प्रज्ज्वला योजनेतून केंद्र सरकारच्या योजनांशी लाखो महिलांना जोडून घेतले. सुहिता योजनेतून महिलांना २४ ७ हेल्पलाइन उपलब्ध करून दिली. निर्मल वारी योजनेतून लाखो महिला वारकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या. महिला केंद्रित विकास आणि महिला नेतृत्वाखाली विकास या संकल्पनांना कायदेशीर सुधारणांचा आधार मिळावा यासाठी वेगवेगळ्या सुधारणा सुचविल्या. त्यात पोस्को सेल, ट्रिपल तलाक सेल, तसेच मानवी तस्करी विरोधात विशेष सेलची निर्मिती यांचा समावेश आहे. विजयाताईंनी डिजिटल लिट्रसी, महिला आयोग आपल्या दारी, महिला आयोगाचे साद नियतकालिक यासारखे उपक्रम देखील घेतले. एका अर्थाने त्यांनी आयोगालाच पुनरुज्जीवन प्राप्त करून दिले होते.
छत्रपती संभाजी नगरच्या महापौर त्याआधी २००७ ते २०१० या कालावधीत तत्कालीन औरंगाबाद आणि विद्यमान छत्रपती संभाजी नगरच्या महापौर असताना विजयाताईंनी शहर केंद्रित महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले. यात आरोग्य सेवेपासून ते पायाभूत सुविधा निर्मितीपर्यंत अनेक घटकांचा समावेश होता. त्याचबरोबर शहराला आंतरराष्ट्रीय पातळीवरचे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून स्वतंत्र ओळख मिळवून दिली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटनाद्वारे शहराच्या महसुलात मोलाची भर घातली. महापौर पदाच्या काळात विजयाताई महाराष्ट्र मेयर कौन्सिलच्या अध्यक्षा आणि ऑल इंडिया मेयर कौन्सिलच्या उपाध्यक्षदेखील होत्या. त्या सध्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट संस्थेच्या सल्लागार संचालिकादेखील आहेत. भौतिक शास्त्रात पदवी आणि इतिहासात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विजयाताईंनी अनेक पुस्तके लिहिली असून त्यामध्ये 'विधिलिखित' या महिलांच्या कायदेविषयक पुस्तक मालिकेचे संपादन , 'अग्निशिखा धडाडू द्या', 'औरंगाबाद : लीडिंग टू वाईड रोड्स', 'मॅजिक ऑफ ब्लू फ्लेम' यांचा समावेश आहे. महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांना राष्ट्रीय कायदा पुरस्कार, तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा सावित्रीबाई फुले पुरस्कार यांनी सन्मानित करण्यात आले आहे.

# वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका आयोजित कार्यकर्ता मेळावा संपन्न



**धारूर । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार शेख मंजुर यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा धारूर शहरातील आर्या फंक्शन हॉल येथे संपन्न झाला.

दलित-मुस्लिम-आदिवासी-ओबीसी समूहामध्ये शेख मंजुर यांच्या उमेदवारीने अतिशय उत्साहाच वातावरण तालुक्यामध्ये निर्माण झालेले आहेत. या बैठकीत प्रास्ताविक रानबा उजगरे यांनी केले. तालुकाध्यक्ष इंजि. प्रशांत उघडे यांनी बोलताना सांगितले पक्षाने दिलेला उमेदवार शेख मंजुर असुन तो सर्व बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्त्यांना मंजुर आहे. येणार्या विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या ताकदीने शेख मंजुर यांच्या पाठीमागे उभा राहण्याचे आश्वासन दिले.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजुर यानी माजलगाव मध्ये नगर परिषदेचे नगराध्यक्ष असताना विविध कल्याणकारी योजना राबवून केलेल्या विकास कामांची माहिती दिली. येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघातील धारूर तालुक्यातील घाट रुंदीकरणाचा प्रश्न असेल धारूर शहरातील पाणीपुरवठ्याची योजना असेल प्रभावी राबवण्याचे धारूरकरांना आणि तालुक्यातील जनतेला आश्वासन दिले. येणाऱ्या काळामध्ये धारूर तालुक्यातील उद्योगधंद्यांचा प्रश्न असेल सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न असेल विद्यार्थ्यांचा प्रश्न असेल अशा अनेक प्रश्नांना घेऊन आपण जर मला संधी दिली तर नक्कीच याची पूर्तता करण्याचे आश्वासन शेख मंजूर भाई यांनी बोलताना दिले. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष भारत तांगडे, सचिन उजगरे वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल भैय्या डोंगरे युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के, माजलगाव तालुका अध्यक्ष संजय नाकलगावकर वडवणी तालुकाध्यक्ष अविनाश झोडगे समाधान गायकवाड, धम्मानंद साळवे धारूर तालुक्याचे महासचिव अभिजीत वाव्हळ, अमोल बनसोडे बाळासाहेब उजगरे शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे, तसेच धारूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन अभिजीत वाव्हळ यांनी केले.

# समाजातील छोट्या समुहाला प्रतीनिधित्व देणारे बाळासाहेब आंबेडकर



**पाथरी । प्रतिनिधी**

लोकशाहीत प्रत्येक समुहाला प्रतीनिधित्वाची संधी मिळणे आवश्यक असले तरीही, आजच्या काळात ती मिळवणे कठीण झाले आहे. परंतु बाळासाहेब आंबेडकर हे एकमात्र नेते आहेत, जे वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून समाजातील सर्वात छोट्या समुहाला प्रतीनिधित्वाची संधी देत आहेत. असे ठाम मत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा निरिक्षक गोविंद दळवी यांनी पाथरी तालुक्यातील मौजे हदगाव बु. येथे बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या सांगता समारंभात व्यक्त केले.

पाथरी तालुक्यातील मौजे हदगाव बु. येथे गेल्या तीन महिन्यांपासून 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन सुरू होते. या ग्रंथाचा सांगता समारंभ १७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमादरम्यान गावातील प्रमुख रस्त्यांनी धम्म रॅली काढण्यात आली. नंतर गावातील माता रमाई सभागृह हदगाव बु. येथे मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली.गोविंद दळवी पुढे म्हणाले, तथागत भगवान बुध्द व त्यांचा धम्म जगाला शांती आणि सद्भावनेची शिकवण देत आहेत. आपण बुध्दाच्या शिकवणीचे अनुसरण केले पाहिजे, ज्यामुळे आपली सामाजिक, वैचारीक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती होईल. त्याचप्रमाणे राजकीय प्रगती सुद्धा आवश्यक आहे.या प्रसंगी भंते पी धम्मानंदजी, कार्यक्रमाचे अध्यक्ष व भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुका अध्यक्ष टि.एम. शेळके, जेष्ठ नेते प्रकाश उजागरे, टि.डी. रुमाले, भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका अनिताखंदारे, केंद्रीय शिक्षक के.वाय. दवंडे, बौद्धाचार्य दादाराव ब्रम्हराक्षे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात गेल्या तीन महिन्यांपासून 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन करणारे प्रकाश नरवडे यांचा त्यांच्या पत्नीसमवेत सत्कार करण्यात आला. तसेच गावातील बालकांना मोफत शिकवणी देणारे सचिन साळवे व दिव्या कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दिलीप मोरे यांनी केले, तर सूत्रसंचलन बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे यांनी केले. आभार ग्रंथ वाचक प्रकाश नरवडे यांनी मानले. सदरील कार्यक्रम संपन्न करण्यासाठी सत्यभामाबाई नरवडे, लताबाई भदर्गे, चंद्रकलाबाई गनकवार, सुनिता साळवे, रुकमीनबाई ढवळे, सत्यभामाबाई मुधावने, आशामती वाव्हळे, मिलिंद खरात, आशोक नरवडे, प्रकाश नरवडे, लक्ष्मण कदम, बळीराम कदम, बि.टी. कदम, दलीत नरवडे सह समस्त गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

# २२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध पत्रकार वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

## जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे पखवाज वादन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे व जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांच्या मंगलमय पखवाज वादनाचे आयोजन दि.२२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती देवून या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले अंबाजोगाईतील वैभवशाली ग्रंथालय साहित्य निकेतनने नुकतेच ८० व्या वर्षांत पदार्पण केले आहे. त्यानिमित्त समाजामध्ये पुस्तक प्रेम वृद्धिंगत व्हावे, समाजातील सांस्कृतिक व चिंतनशील विचारांची देवाण - घेवाण वाढावी या हेतूने साहित्य निकेतन ग्रंथालय आपल्या परीने विशेष प्रयत्न करीत आहे. अशाच एक प्रयत्नांतून यावर्षी ऑगस्ट महिन्यात गीत रामायणाचे रचयिते व प्रख्यात साहित्यिक, कवी, गीतकार ग.दि.माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली रसाळ कृष्ण कथा गीत गोपालचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला अंबानगरीतील सुजाण नागरिक, रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. पुन्हा एकदा असाच एक वेगळा विषय घेऊन दि.२२ ऑक्टोबर मंगळवार रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे दुपारी ४ वाजता जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे मंगलमय पखवाज वादन सादर होणार आहे. त्यानंतर नामवंत पत्रकार व चिंतनशील अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांचे मविकसित भारतातील महाराष्ट्राचे योगदानफ या विषयावरील व्याख्यान होणार आहे. उदय निरगुडकर यांनी मागील दोन दशकांहून अधिक काळ शिक्षण, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन कौशल्य, आर्थिक क्षेत्र, आयटी उद्योग तसेच न्यूज मिडीया अशा अनेक ठिकाणी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाच्या पदांवर कार्य केले आहे. त्यांचा अनुभव व त्यातून त्यांनी केलेले चिंतन ऐकण्यासाठी आपण व आपले सर्व सहकारी यांनी व्याख्यानासाठी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंबाजोगाई शहरांसह परिसरात सोमवारी दुपारी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार, अंबाजोगाई शहरांसह परिसरात सोमवारी दुपारी दिडच्या सुमारास विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते.

हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार,

सोमवारी दुपारीआलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.दि. ऑक्टोबर सोमवार रोजी दुपारी दीड वाजायच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई शहरांसह तालुक्यात पावसाने झोडपले. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.

दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह, वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. जोरदार पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता. पावसामुळे शेतकऱ्यांचे भाजीपाला, शेतातील सोयाबीन याचे मोठे नुकसान झाले आहे, अशी माहिती मिळाली आहे.सायंकाळ पर्यंत दिवसभर ढगाळ वातावरण पसरले होते.

# काँग्रेस पक्षाला मतपत्रिकेवर येऊ द्या अन्यथा जिल्हात पक्ष गोठेल : अन्यथा राजीनामासत्र

**केज । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्ष्याच्या सन्मानासाठी केज मतदार संघातून उमेदवारी लढवणारच -- दत्ता कांबळे




विधानसभा निवडणुकीच्या पार्शश्वभुमीवर भारतीय काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्हातील काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्यासाठी पक्षश्रेष्ठिला भावनिक हाक दिली आहे.

जिल्हायातील काँग्रेस पक्ष जिवंत राहण्यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्टीने जिल्ह्यातील किमान तीन मतदार संघावर दावा केला होता, परंतु आघाडी धर्मात जुळून घेण्यासाठी किमान परळी आणि केज हे दोन मतदार संघ सोडून घ्यावेत असा आग्रह होता.परंतु आघाडी मध्ये काँग्रेस ला जिल्ह्यातील एकाही मतदार संघात काँग्रेस पक्षाला जागा मिळत नसेल तर, जिल्ह्यातील भारतीय काँग्रेस पक्ष मतपत्रिकेवर आलाच नाही तर पक्ष आणि पक्षाच्या संघटनेशी जुडलेला कार्यकर्ते जिवंत राहणार नाहीत, परिणामी जिल्ह्यातील पक्ष संघटना गोठेल याची दक्षता पक्ष श्रेष्ठीने घ्यावी अशी भावनिक हाक पक्षाचे अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठिकडे केले आहे.

तसेच सद्या काँग्रेस मधील डझन भर कार्यकर्त्यांनी पक्ष श्रेष्टीकडे आपल्याकडे असणाऱ्या पदाचा व पक्ष्याच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामे देण्याच्या हालचाली सुरु केल्या असून, केज किंवा परळी मतदार संघात काँग्रेस पक्षाला उमेदवारी मिळाली नाही तर जिल्हाभरतील काँग्रेस कार्यकर्ते सांगली पॅटर्न राबून काँग्रेस जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करतील याची नोंद पक्ष श्रेष्ठी व महाविकास आघाडी यांनी घ्यावी असा इशारा ही अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे इशारा दिला आहे. तसेच काँग्रेस पक्षाच्या जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला स्वाभिमान आबादित ठेवण्यासाठी उमेदवारी अर्ज भरून उमेदवारी लढवण्याचं आव्हान करत, आपण स्वतः केज विधानसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरून पक्षाच्या सन्मानासाठी उमेदवारी लढवणारच असा इशारा काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# पत्र्याच्या शेड मधील कापसाला मध्य रात्रीनंतर आग लागून लाखाचे नुकसान



**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील चौंडी येथे मध्यरात्रीनंतर आग लागल्याने एक शेतकरी एक लाख रुपयांचे नुकसान भोगला आहे. कापसाची वेचणी करून घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये साठवलेल्या २५ क्विंटल कापसाला शनिवारी (दि. १९) मध्यरात्री दोनच्या सुमारास आग लागली.

चौंडी येथील भीमा यंका मुंडे कुटुंबासह शेतात वास्तव्य करतात. सध्या कापूस वेचणी चालू असल्याने त्यांनी कापसाची गंजी घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये बंद खोलीत ठेवली होती. शनिवारी रात्री पाऊस आल्याने मुंडे कुटुंबीय घरात जाण्यासाठी उठले असता, पत्र्याच्या शेड मधून धूर निघत असल्याचे त्यांना जाणवले. सावधानता राखत त्यांनी तातडीने आग लागलेल्या कापसाच्या गंजी मधील अर्धा कापूस वेगळा केला, त्यामुळे १५ क्विंटल कापूस राख होण्यापासून वाचला.

तथापि, जवळपास १२ ते १३ क्विंटल कापसाचे जळून राख झाले, ज्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. या शेतकऱ्यास तातडीने शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी केली जात आहे. घटनास्थळी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी रविवारी येऊन पाहणी करत पंचनामा केला.विशेष म्हणजे, पत्र्याच्या शेडमध्ये लाईटचे कनेक्शन नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना अधिक सुरक्षा आणि संरक्षण आवश्यक आहे.

# महायुतीकडुन माजलगांव मतदारसंघात धनगर जमातीच्या माधवराव निर्मळ यांना उमेदवारी द्यावी-शिवदास बिडगर



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघात धनगर जमातीच्या माधवराव निर्मळ यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी शिवदास बिडगर यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात धनगर जमातीचे ३ लाख पेक्षा जास्त मतदान आहे. मागील झाले लोकसभा निवडणूकित महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ माधवराव निर्मळ बीड जिल्ह्यात धनगर जमात समाज बांधवाना एकजूट करून मोठी मतधिकय दिले होते. माधवराव निर्मळ हे नेहमीच महायुतीसाठी जीवाचे रान करणारे नेतृत्व आहेत. त्यांना माजलगाव मतदारसंघात त्यांना महायुतीने उमेदवारी द्यावी अशी मागणी बिडगर यांनी दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून माजलगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक माधवराव निर्मळ हे सामान्य कुटुंबातील व्यक्ती असून अत्यंत मेहनतीतून, कष्टातून आणि परिश्रमातून ते उभे राहिलेले आहेत.आज एक यशस्वी उद्योजक म्हणून त्यांची राज्यभर प्रतिमा आहे.अशा यशस्वी उद्योजकाच्या पाठीशी उभे राहून या मतदार संघाचा विकास करण्याची भूमिका या मतदारसंघातील मतदारांनी घेतली आहे. मतदारसंघातून समाजसेवक माधव निर्मळ यांनी जनमानसात आपले वलय निर्माण केले आहे. माजलगावात निर्मळ यांनी निवडून येतील एवढी ताकद या ठिकाणी उभी केली आहे. माजलगांव मतदारसंघात धनगर जमातीचे मतदान मोठ्या प्रमाणत असल्यामुळे माधवराव निर्मळ यांना उमेदवारी देण्यात यावी. सर्वसामान्य जनतेच्या मनातील जीवाभावाचे आमदार म्हणून ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्य गोरगरीब माणसांपासून ते सधन लोकांपर्यंत सर्वांना त्यांचा चांगला परिचय आहे. प्रत्येकाच्या सुख दुःखात धावून जाण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात मानाचे स्थान मिळवले आहे. त्यांचे प्रत्येक पक्ष व कार्यकर्त्यांशी चांगले संबंध आहेत. अनेकांचे विविध प्रश्न फक्त फोन करून मार्गी लावतात. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार झाले तर निश्चितपणे माजलगाव मतदार संघाचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही. चांगले काम करण्याची धमक त्यांच्यात आहे. यामुळे माधवराव निर्मळ सारख्या उमद्या व्यक्तिमत्वालाच महायुतीकडून उमेदवारी द्यावी अशी मागणी परळीतील धनगर जमातीचे युवा नेते शिवदास बिडगर यांनी केली आहे.

# शिवनेरभूषण आणि शिक्षणमहर्षी तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्यांना प्रदान



**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर येथील आयोजित कार्यक्रमात शिवनेरभूषण, शिक्षणमहर्षी स्व. तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते स्व. विष्णू पाटीलबा शिंदे (आप्पा) यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक आणि व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी आमचे भविष्य आमच्या हाती या विषयावर विचार व्यक्त केले. डॉ. कळमकर म्हणाले, आयुष्यात संकट आणि संधी दोन्ही येतात, परंतु संकटावर मात करून संधीचे सोनं करणे महत्त्वाचे आहे. आपल्यातील कार्याची आणि कर्तुत्वाची जाणीव संकटे किंवा संधी आल्यावर होते. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर आलेल्या संधींचा योग्य लाभ घेण्याचा सल्ला.

# मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार देण्याचा घेतला निर्णय

**गंगापूर । प्रा संजय तुपे**

सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेले अंतरवाली सराटी तालुका अंबड येथे रविवार दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी समाज बांधवांचे मत अजमावण्या साठी बैठक आयोजित करण्यात आली होती.पूर्वी उमेदवारउभे करायचे की इतरांचेपाडायचेअसा इशारा देणारे मराठा आरक्षणआंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अखेर विधानसभेच्या निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला. अंतरवाली सराटी ता. अंबड येथे रविवारी ता. २०/१०/२०२४ रोजी समाज बांधवांची मते अजमावून घेतल्यावर त्यांनी निवडणुकीत उमेदवार उभे करणार असल्याचे जाहीर केले.जरांगे पाटील यांनी यापूर्वी इच्छुक उमेदवारांची चाचपणी करून त्यांच्याकडून प्रस्तावही स्वीकारले होते. अशा इच्छुकांना गेल्या शुक्रवारी अंतरवाली सराटीत पाचारण करूनत्यांची मते पुन्हा अजमावून घेतली होती. त्यानंतर समाजबांधवांच्या बैठकीत अंतिम निर्णय होईल, असेत्यांनी स्पष्ट केले



होते. त्यानुसारआज समाज बांधवांची बैठक झाली.बैठकीनंतर जरांगे यांनी भूमिका मांडली. त्याला उपस्थितांनी आवाजीआणि हात उंचावून होकार दिला. राज्यात निवडून येण्याची खात्री असलेल्या मतदारसंघांत उमेदवार उभे करू, जेथे आपला उमेदवार नाही तेथे आपल्या विचारांचा व आपल्या सोबत असलेल्या उमेदवाराला पाठिंबा देऊ, पाठिंब्याचे हमीपत्र त्याच्याकडून घेतले जाईल,राखीव जागांवर मराठा समाजाच्या विचारांच्या कोणत्याही पक्षाच्या उमेदवारास विजयी करू, असे जरांगेयांनी जाहीर केले. समीकरण जुळेल तेथे उमेदवार उभे करायचे, समीकरण जुळणार नाही तेथे इतरांचे पाडायचे,आपल्या विचारांचे लोक निवडूनआणायचे, असे जरांगे यांनी सांगितले.संबंधितांनी अर्ज भरावेत, कुणी माघार घ्यायची किंवा कसे याबाबत २९ ऑक्टोबरला सांगितले जाईल, असेहीत्यांनी आपल्या इच्छुकांना सांगितले.फडणवीसांवर टीकाजरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस व भाजपवर पुन्हा टीका केली. चौदा महिने आंदोलन करूनही आरक्षण,निर्णयाची अंमलबजावणी, गॅझेटसगेसोयऱ्यांबाबतच्या लागू करणे आदी मागण्यांची पूर्तताझाली नाही. समिती नाही, अहवाल नाही. कोणतेही आंदोलन नसताना फडणवीस यांनी पंधरा जातींनाओबीसी आरक्षण दिले. मराठ्यांना मुद्दाम आरक्षण दिले नाही. शिंदे समितीला काम करू दिले नाही, ईडब्लूएस रद्द केले, कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप फडणवीस यांनी रोखले. शेतमालाला भाव,शेतकऱ्यांना कर्जमाफी, पीकविमा दिला नाही.जे कायमचे हवे आहे ते नदेता त्यांनी अन्य योजना आणल्या,असा आरोप त्यांनी केला.असा आहे जरांगे पॅटर्नविजयाची खात्री असलेल्या जागांवर उमेदवार देणारएससी,एसटी या राखीव जागांवर कोणत्याही पक्षाचा,पण मराठासमाजाच्या विचारांचा उमेदवार निवडून देणार.जेथे उमेदवार उभे करायचे नाहीत अशा ठिकाणी,मराठासमाजाच्या विचारांचा,आमच्या सोबत आहे असे लिहून देणाऱ्याउमेदवारांना पाठिंबा देऊन निवडून आणणार, प्रचार करणारअभ्यास करून अर्ज माघारी बाबत २९ ऑक्टोबरला निर्णय घेणार त्यानंतर कोणी बंडखोरी केल्यास साथ देणार नाही, प्रचार करणार नाही राजकारणात जाऊ नये, असे वाटत होते. पण मीसमाजाच्या पुढे नाही. समाज म्हणत असेल तर निवडणुकीत उमेदवार उभे करू, पण हा लढा बंद पडता कामा नये, समाज फुटता कामा नये. महाविकास आघाडी–महायुती हे सारखेच आहेत, ते सख्खे भाऊ आहेत. ते आरक्षण देतील का हे सांगता येत नाही.मनोज जरांगे मराठा आंदोलक

# सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी



**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयात तिथीनुसार महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली.या वेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक उदय बोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील सहशिक्षिका शुभांगी पवार यांनी महर्षी वाल्मिकी यांनी त्या काळात केलेल्या कार्याची आठवण करून दिली. त्यांनी रामायण हे मोठे महाकाव्य रचले, आपल्या हातून झालेल्या पापातून मुक्त होण्यासाठी तपश्चर्येचा मार्ग अवलंबिला. त्यांनी भारतीय संस्कृती, परंपरा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केला. असे सांगितले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अविनाश दिघे यांनी केले तर आभार इकबाल शेख यांनी मानले. या कार्यक्रमास विदयार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक बदला : मुडेगावकर, लोमटे, देशमुख

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई शिवसेना संघटनात्मकदृष्ट्या वाढली पाहिजे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत शिवसेनाप्रमुख एकनाथराव शिंदे यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री करायचे आहे. त्यामुळे केज मतदारसंघात शिवसेना संपविण्यासाठी शिवसेना फोडण्यासाठी जे लोक काम करीत आहेत. अशा लोकांना प्रत्येक निवडणुकीत आम्ही कसे व का सहकार्य करावे ज्या शिवसैनिकाला मतदारसंघातील प्रश्न समस्या माहीत आहे. व जो मतदारसंघातील आहे अशाच नेत्याला केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर, शहरप्रमुख ऋषिकेश लोमटे व दादासाहेब देशमुख यांनी केली ते अंबाजोगाईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय प्रशांतनगर येथे शिवसेना (शिंदे गट) यांच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती या पत्रकार



परिषदेत बोलताना शहरप्रमुख ऋषिकेश आण्णासाहेब लोमटे यांनी सांगितले की विधानसभेवर भगवा पुन्हा एकदा फडकवायाचा आहे. शिवसेना संघटनात्मकदृष्ट्या वाढली पाहिजे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत शिवसेनाप्रमुख एकनाथराव शिंदे यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री करायचे आहे. त्यामुळे केज मतदारसंघात शिवसेना संपविण्यासाठी शिवसेना फोडण्यासाठी जे लोक काम करीत आहेत. अशा लोकांना प्रत्येक निवडणुकीत आम्ही कसे व का सहकार्य करावे ज्या शिवसैनिकाला मतदारसंघातील प्रश्न समस्या माहीत आहे व जो मतदारसंघातील आहे अशाच नेत्याला केज विधानसभा मतदारसंघाचे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविण्यात यावी आम्ही समन्वयक म्हणून दादासाहेब देशमुख यांचे नांव सुचवित आहोत अंबाजोगाई शहर व तालुक्यात शिवसेनेचे पाच हजारांहून अधिक सक्रिय सभासद आहेत मराठी माणूस मोठा झाला पाहिजे, शिवसेना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी निवडणूक लढवायची आहे शिवसेनेकडे वैजनाथ वाघमारे रामहरी राऊत व लहू बनसोडे हे इच्छुक उमेदवार आहेत. महायुती म्हणून आम्ही काम करणार आहोत पण शिवसेना संपविण्याचे षडयंत्र कोणी करू नये अन्यथा आम्हाला आमची ताकद दाखवून द्यावी लागेल असा इशारा शहरप्रमुख ऋषिकेश लोमटे यांनी दिला. तर यावेळी शिवसेनेचे (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर म्हणाले की, मुख्यमंत्री शिंदे साहेबांसाठी आम्ही महायुतीचे काम करू, ज्या शिवसैनिकाला मतदारसंघातील प्रश्न, समस्या माहीत आहे. केज विधानसभेचा समन्वयक हा मतदारसंघातीलच असावा समन्वयकास अनुभव मतदारसंघातील प्रश्न्न समस्या माहीत असाव्यात. पाच वर्षे शिवसेनेची माणसे फोडणे, केज मतदारसंघात शिवसेना वाढू द्यायची नाही तसेच घटक पक्ष संपविण्याचे धोरण भाजपाने अवलंबिले आहे हे कसे विसरायचे. त्यामुळे आम्हाला भाजपाने ग्रहित धरू नये असे उपजिल्हाप्रमुख मुडेगावकर यांनी सांगितले शिवसेनेकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या लहू बनसोडे यांनी मागील ३० वर्षांपासून केज राखीव मतदारसंघात फक्त एकाच कुटुंबाची सत्ता कायम आहे. त्यामुळे मतदारसंघात विकासाचे प्रश्न समस्या सुटू शकले नाहीत. कोणत्या ही तरूणाला रोजगार उपलब्ध झाला नाही. केज मतदारसंघातील सर्वसामान्य माणूस व बहुजन समाज विकासापासून कोसो दूर आहे त्यामुळे मतदारांनी शिवसेनेला एकदा आशिर्वाद व संधी द्यावी आम्ही संधीचे सोने करू जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करू असे आवाहन बनसोडे यांनी केले

# हिवरापाहाडी डोगरपटयात मुसळधार पाऊस कुंडलिक नदीला पूर


**बीड । प्रतिनिधि**

बीड तालुक्यातील बालाघाट डोगरपटयातील बोरफडी हिवरापाहाडी देवळा कोरडेवाडी पिराचीवाडी परिसरात सोमवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह चित्रा नक्षत्रांचा जोरदार पाऊस झाला या पावसामुळे बोबाटि सुळनदि सह कुडलिका नदीला मोठा पूर आला या पावसामुळे कुठेही जिवित अथवा वित हानी झाल्याचे वृत्त नाही. या बद्दल अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील बालाघाट डोंगर पट्ट्यातील हिवरापाहाडी बोरफडी तर केज तालुक्यातील पिराचीवाडी कोरडयाचीवाडी खडकी देवळा परीसरात सोमवारी दुपारी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला या पावसामुळे नदी नालयासह बोबाटि सुळनदि सह कुडलिका नदीला मोठा पूर आला या पुरामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती या पावसामुळे कुठेही जिवित अथवा वित हानी झाली नाही हा चित्रा नक्षत्रांचा पाउस रब्बी हंगामातील पेरणी साठी चांगला ठरणार आहे असे शेतकरी वर्गाकडून बोलले जात आहे.

# रिपाई एकतावादीची महत्व पूर्ण बैठक-शैलेंद्र पोटभरे

**बीड । प्रतिनिधी**

आगामी होत असलेल्या विधानसभा निवडणूक संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी ची अंबाजोगाई कृष्णा हॉटेल येथे दिनांक २२ रोजी मंगळवार दुपारी १:३० वाजता ठेवण्यात आली असून तालुकाप्रमुख सर्कल प्रमुख महिला आघाडी पदाधिकारी यांनी बैठकीत उपस्थित राहावे असे रिपाई एकतावादीचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा



अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी एका पत्रकाद्वारे कळवले आहे.

# महायुतीने केज मतदार संघाच्या उमेदवारी बाबत पुनर्विचार करावा–दिपक कांबळे

**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघातून पप्पू कागदे यांना महायुतीची उमेदवारी घोषित होईल अशी आशा आंबेडकरी जनतेमध्ये होती .मागील ५ महाराष्ट्रात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ला महायुती सत्तेवर असतानाही दिलेला शब्द पाळला नाही त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष असतानाही केज विधानसभेसाठी मा. रामदास आठवले पप्पू कागदें साठी आग्रही असतानाही केजची उमेदवारी



डावलण्यात आल्यामुळे केज मतदार संघात प्रचंड नाराजी पसरली आहे.भाजप रिपब्लिकन पक्षाचा केवळ निवडणुका पुरता वापर करत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे.केज मतदार संघात महायुतीचे काम रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते करणार नाहीत केजच्या उमेदवारी बाबत भाजपने पुनर्विचार करावा अन्यथा केज विधानसभेची निवडणूक पप्पू कागदें यांनी लढवून अनुसूचित जाती साठी राखीव असलेल्या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करून आंबेडकरी जनतेस न्याय द्यावा हीच सर्वसामान्य मतदारांची भावना आहे.दिपक कांबळे

# आदर्श आचारसंहिता लागू होण्याच्या ४८ तासात जिल्ह्यातील २४ हजार ९६९ जाहिराती काढल्या

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासूनच्या ४८ तासामध्ये जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच खाजगी मालमत्तेवरील भित्तीपत्रके, घोषणा फलक, रंगविलेल्या जाहिराती, कोनशिला, झेंडे काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय कार्यालय परिसरातील ११ हजार ६४१, सार्वजनिक ठिकाणच्या ९ हजार ५०२ तर खाजगी मालमत्तेवरील ३ हजार ८२६ अशा एकूण २४ हजार ९६९ जाहिराती काढण्यात आल्या असल्याची माहिती आचारसंहिता कक्षातर्फे देण्यात आली आहे. अकोले विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८६४, सार्वजनिक ठिकाण ३९१ तर खाजगी मालमत्तेवरील ३२० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.





संगमनेर मतदारसंघ कार्यालय परिसर ८१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ८८, खाजगी मालमत्तेवरील २५५, शिर्डी मतदारसंघ कार्यालय परिसर ९१६, सार्वजनिक ठिकाण १ हजार ६४१, खाजगी मालमत्तेवरील ३५१, कोपरगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ९५४, सार्वजनिक ठिकाण ६१९, खाजगी मालमत्तेवरील ३०९, श्रीरामपूर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १३१, सार्वजनिक ठिकाण १ हजार ५५० एवढ्या जाहिराती हटविण्यात आल्या.नेवासा मतदारसंघ कार्यालय परिसर ३२४, सार्वजनिक ठिकाण ५७७, शेवगाव मतदारसंघ कार्यालय परिसर ८५४, सार्वजनिक ठिकाण ९३७, खाजगी मालमत्तेवरील १ हजार ७२३, राहुरी मतदारसंघ कार्यालय परिसर २५४, सार्वजनिक ठिकाण १४१, खाजगी मालमत्तेवरील २१, पारनेर मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार १२३, सार्वजनिक ठिकाण ९७८, खाजगी मालमत्तेवरील ४९५ जाहिराती काढण्यात आल्या. अहमदनगर शहर मतदारसंघ कार्यालय परिसर २८६, सार्वजनिक ठिकाण ४१६, खाजगी मालमत्तेवरील ४१, श्रीगोंदा मतदारसंघ कार्यालय परिसर १ हजार २९४, सार्वजनिक ठिकाण ८०२, खाजगी मालमत्तेवरील ३११ तर कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघामध्ये शासकीय कार्यालय परिसर १ हजार ८२५, सार्वजनिक ठिकाणच्या ३६२ जाहिराती काढण्यात आल्या असल्याचे आचारसंहिता कक्षातर्फे कळविण्यात आले आहे.

# नाव्होली परिसरावर निसर्ग कोपला ढगफुटी झाल्याने नदीनाल्यांना महापुर

## शेताचे झाले तळे पुलावरून पाणी ;तिन तास वाहतूक ठप्प

**केज । सचिन भालेराव**

गेल्या दोन वर्षात एवढा पाऊस पडला नाही. एवढा मोठा ढगफुटी सारखा पाऊस काल नाव्होली येथे पडला.त्यामुळे नद्यांना पूर परिस्थिती निर्माण झाली होती. अचानक आलेल्या या पावसामुळे परिसरातील नागरिकांची मोठी दैना झाली. जुन महिन्यांपासून आत्तापर्यंत असा पाऊस कधीच पडला नव्हता. एवढा मोठा पाऊस पडल्याने रब्बीची पेरणी केलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.तसेच खरीपातील काढणी केलेल्या सोयाबीन पिकाचे ढिगारे भिजुन गेल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावुन घेतला असल्याचे दिसून येत आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की केज तालुक्यातील नाव्होली आणि परिसरातील गावांमध्ये गेल्या जुन महिन्यातील मृग नक्षत्रात छोटा मोठा पाऊस पडत गेला त्यावर खरीपाची पिके चांगली आली. हे पिक काही शेतकऱ्यांनी काढुन मळनई केली तर काही शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाचे ढिगारे लावून ठेवले होते. सध्या पावसाचे दिवस संपले असुन पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. हा प्रवास देखील अंतिम टप्प्यात असला तरी या भागात अधुनमधून रोजच पाऊस येत आहे. अशातच काही शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाची काढणी करुन त्या शेतात रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली आहे. त्यामध्ये पावटा(राजमा), ज्वारी,हरभरा हि पेरली गेली आहेत. तर काही शेतकऱ्यांची पेरणी करणे बाकी आहे. अशातच काल दि.२१ ऑक्टोबर सोमवार रोजी दुपारी १:३० वाजता अचानक आलेल्या अवकाळी पावसाने कहर केला. तिन तास पडलेल्या या पावसामुळे नदी नाले एक होवुन पुर आले होते. तसेच शेतात जिकडे तिकडे पाणीच पाणी झाल्याने शेताला तळ्याचे स्वरूप आले होते. विजांच्या गडगडाटासह पडलेल्या या मुसळधार पावसामुळे शेतात झाकून ठेवलेले सोयाबीनचे ढिगारे भिजुन गेले आहेत. काल पडलेल्या या पावसामुळे अक्षरशः पिकांसह शेतातील माती खोदून गेली आहे. या पावसामुळे नद्यांना मोठे पुर





आल्याने शिरुरघाट, नाव्होली येथील पुलावरून पाणी असल्यामुळे या ठिकाणी तिन तास वाहने उभी होती. नाव्होली गावावर अशाच प्रकारचे संकट उन्हाळ्यात देखील आले होते. त्यानंतर हा कालचा निसर्गाचा प्रकोप पहावयास मिळाला. नाव्होली आणि परिसरातील गावातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून प्रशासनाकडून बाधीत शेतकऱ्यांना मदतीची मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

तर केज नांदुरघाट या मार्गावरील दोन मोठे पुल त्यामध्ये नाव्होली, शिरुरघाट, आणि दोन लहान पुल त्यामध्ये चिंचोली माळी आणि नांदूरघाट जवळील माळ्याच्या शेताजवळील हे चार पुल करणे अत्यंत गरजेचे आहे.ज्यामुळे वाहतूक सुरळीत सुरू राहील. त्यामुळे हे पुल सा.बां विभागाने तात्काळ मंजुरी घेवुन उभारण्यात यावेत अशी मागणी या भागातील जनतेतुन केली जात आहे

# अँड शिवानंद हैबतपूरे सर यांच्या लिंगायत जनसंपर्क अभियानाचा आज समारोप

**नायगाव । प्रतिनिधी**

८९ नायगांव विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लिंगायताचे नेते अँड शिवानंद हैबतपूरे सर यांनी भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय आमदार राजेश पवार यांच्या प्रचारासाठी मतदारसंघातील लिंगायत समाजाच्या भेटी घेण्यासाठी त्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून लिंगायत जनसंपर्क अभियान सुरू केले होते त्यामाध्यमातून त्यांनी नायगाव मतदारसंघातील गावोगावी जाऊन लिंगायत समाजाच्या भावना जाणून घेत आपण भाजपाचे आमदार राजेश पवार यांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी मतदार संघातील लिंगायत बांधवांना केले कारण भाजपा हा पक्ष सदैव लिंगायत समाजाचा सकारात्मक विचार केलेला आहे लिंगायत समाजाच्या अजित गोपछेडे यांना राज्यसभेची खासदारकी दिलेली आहे आमदार राजेश पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन निवडून द्यावे असे ते म्हणाले व त्यांच्या लिंगायत जनसंपर्क अभियानाचा आज दिनांक २० ऑक्टोबर रोजी समारोप करण्यात आला हानुमंत चंदनकर नायगाव नांदेड

# गिरजाबाई सौदागर यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथिल मूळ रहिवाशी धानोरा येथे निवासी असलेल्या जेष्ठ महिला गिरजाबाई भाऊराव सौदागर वय ७८ वर्ष यांचे वृद्धपकाळाने सोमवार रोजी सायंकाळी निधन झाले.त्यांच्यावर धानोरा येथे आज मंगळवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा सून नातवंडे असा मोठा परिवार आहे.प्रेमळ स्वभावाच्या काकू म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. त्या पत्रकार डॉ हनुमंत सौदागर यांच्या चुलती होत



## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात दहावी अटक

# बेड्या ठोकलेला भगवंत सिंग हत्यारे घेऊन उदयपूरहून मुंबईत आला

**मुंबई । प्रतिनिधी**

माजी मंत्री बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात मुंबई पोलिसांनी दहाव्या आरोपीला अटक केली आहे. आरोपी भगवंत सिंगला बेलापूर, नवी मुंबई परिसरातून अटक करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, भगवंत सिंग उदयपूरहून मुंबईत एका अन्य आरोपीसह शस्त्रे घेऊन आला होता.

भगवंत सिंग सुरुवातीपासून शूटर्स आणि कट रचणाऱ्यांच्या संपर्कात होता. मुंबई पोलिसांच्या क्राइम ब्रँचचे १५ पथक वेगवेगळ्या अँगलने या प्रकरणाचा तपास करत आहेत. एक दिवस अगोदर म्हणजेच १९ ऑक्टोबर रोजी पाच आरोपींना अटक करण्यात आली होती. या पाच आरोपींमध्ये नितीन सप्रे, रामफुलचंद कनोजिया, संभाजी किशोर पारधी, प्रदीप दत्तू ठोंबरे आणि चेतन पारधी यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी मुख्य सूत्रधार शुभम लोणकर आणि सूत्रधार मोहम्मद जीशान अख्तर यांच्या संपर्कात होते, परंतु दोघेही अद्याप फरार आहेत. न्यायालयाने या सर्व आरोपींना २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस



कोठडी सुनावली आहे.

१२ ऑक्टोबरच्या रात्री, बाबा सिद्दीकी यांचा मुलगा झीशानच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई गँगने या हत्येची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांनी बाबांच्या हत्येमागे बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानला जबाबदार धरले आहे. यामुळे सलमान खानला ईमेलद्वारे जीवे मारण्याच्या धमक्या आल्याचे समजते.मुंबई पोलिसांच्या माहितीनुसार, नितीन गौतम सप्रे आणि फूलचंद कनोजिया हे या हत्याकांडाच्या मॉड्यूलचे प्रमुख सदस्य आहेत. सिद्दीकी यांच्या हत्येसाठी वापरली गेलेली शस्त्रे या मॉड्यूलने नेमबाजांना पुरवली होती, ज्यात विदेशी बनावटीचे टिसास-ग्लॉक आणि देशी बनावटीचे पिस्तूल समाविष्ट आहेत. या शस्त्रांचा उपयोग उत्तर भारतातून करण्यात आला होता.

अटक करण्यात आलेला नितीन गौतम सप्रे हा हिस्ट्रीशीटर आहे, जो २०१५ मध्ये एका खुनाच्या गुन्ह्यात सामील होता. त्याच्यावर खुनाचा प्रयत्न आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या गुन्ह्यातही आरोप आहेत. फुलचंद कनोजिया देखील हिस्ट्रीशीटर आहे. फरार आरोपींवर लुकआउट नोटीस जारी करण्यात आली आहे, ज्यात गँगस्टर शुभम लोणकर आणि मास्टरमाईंड मोहम्मद जीशान अख्तर यांचा समावेश आहे. पोलिस यापूर्वी अटक केलेल्या आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लावण्याची शक्यता देखील तपासत आहेत. या प्रकरणात अनेक दृष्ये उलगडत असून, पोलिसांचा तपास सुरु आहे.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ,घनसावंगी विधानसभेचे प्रथम प्रशिक्षण संपन्न

**जालना । असलम कुरेशी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी घनसावंगी विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण सोमवारी संपन्न झाले.

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जालना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, अपर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण सोमवारी दुपारी ११ ते २ मतदान केंद्राध्यक्ष व सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष तसेच दुपारी २ ते ५ इतर मतदान अधिकारी या दोन सत्रात मॉडेल कॉलेज, राजेगाव रोड, घनसावंगी येथे संपन्न झाले. सदरील प्रशिक्षण वर्गास मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी निहाय कर्तव्य व जबाबदारींचे सूक्ष्म मार्गदर्शन पीपीटीद्वारे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलमान्वये मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली



असून निवडणूक आयोगाच्या प्रतिनियुक्तीवर असल्याबाबतची जाण करून देण्यात आली. मतदान प्रक्रियेतील असलेल्या महत्वाच्या टप्प्याबाबत माहिती, साहित्य वाटप, मतदान पूर्व, मतदानादरम्यान, मतदान संपल्यानंतरच्या संपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडणे, निवडणूक साहित्य स्विकृती व तपासणी करणे, ई.व्ही.एम. तपासणी, व्ही.व्ही.पॅट संबंधी माहिती, चिन्हांकित फोटो मतदार यादी, मतदानाच्या आदल्या दिवशी करावयाची तयारी, मतदान केंद्रावर करावयाच्या बाबी, निवडणूक कायद्याची अंमलबजावणी, मॉकपोल बाबतचा फ्लो चार्ट, मतदानासंबंधीची गुप्तता, मतदाराची ओळख पटविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, महत्वाचे अहवाल/नमूने तयार करणे तसेच या निवडणूकीमध्ये काही नवीन बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. जे मतदार प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येऊन मतदान करू शकत नाहीत, त्यामध्ये ८० वर्षावरील जेष्ठ मतदार, दिव्यांग मतदार, कोविड-१९ संबंधित मतदार, अत्यावश्यक सेवा पुरविणारे मतदार यांच्यासाठी टपाली मतपत्रिकेद्वारे त्यांचे मतदान करून घेण्याबाबत सविस्तर माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबड श्रीमती मनिषा दांडगे यांनी दिली.

नीवडणूकीसाठी एकूण ४४७ मतदान केंद्राध्यक्षांची नेमणूक केली असून सदरील प्रशिक्षणास ४४० मतदान केंद्राध्यक्ष हजर होते. ४२९ सहाय्यक मतदान केंद्राध्यक्षांची नेमणूक केली असून सदरील प्रशिक्षणास ४११ सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष हजर होते. तसेच ९१७ इतर मतदान अधिकारी यांची नेमणूक केली असून सदरील प्रशिक्षणास ८३५ इतर मतदान अधिकारी हजर होते.

सदरील प्रशिक्षणानंतर उपस्थित मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांना ईव्हीएम हाताळणी करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले.

सदरचे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार घनसावंगी श्रीमती योगिता खटावकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार अंबड श्री.विजय चव्हाण, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार, घनसावंगी श्री.संतोष इथापे, नायब तहसीलदार, घनसावंगी श्री.सोमनाथ तोतला, नायब तहसीलदार, घनसावंगी श्रीमती मोनाली सोनवणे, गटशिक्षणाधिकारी, पं.स.घनसावंगी श्री.रवि जोशी यांच्यासह गोविंद नाईक, कैलास आरगडे, विलास मुसळे, अशोक बडवणे, विठ्ठल कथले, किशोर थोरात आदींनी परिश्रम घेतले.

## बिबट्याची झडप चिमुकल्यावर

# आईच्या डोळ्या समोरून नेले उचलून

**पुणे । प्रतिनिधी**

मांडवगण फराटा येथे रात्री दुःखदायी घटना घडली आहे. ही घटना गावापासून सव्वादोन किलोमीटर अंतरावर असलेल्या गूळ तयार करण्याच्या गुऱ्हाळावर घडली आहे.

हे गाव शेतीप्रधान आहे, जिथे बाराही महिने नदीचे पाणी उपलब्ध असते. यामुळे गावाचा व्यवसाय मुख्यतः शेतीवर आधारित आहे, आणि त्याला जोडधंदा म्हणून दूध, छोटे-मोठे व्यवसाय व ऊसापासून गूळ तयार करणे हेसुद्धा व्यापारी उपक्रम आहेत. यासाठी लोक बाहेरून कामासाठी येतात, विशेषतः यूपी, राजस्थान आणि बिहार भागातील. गावात शाळा आणि मोठे विद्यालय असल्यामुळे येथे मोठी वर्दळ असते. मांडवगण फराटा येथील दगडवाडी रोडवरील गोकुळनगर येथे संदीप अशोक घाडगे यांच्या गुऱ्हाळात ही घटना घडली. येथे काम करण्यासाठी अनेक कामगार आहेत, त्यात राजकुमार सिंग व त्याची पत्नी रेखा हे जोडपे देखील आहेत. यामध्ये किरकोळ घरगुती कारणांवरून भांडण झाले, ज्यामुळे पत्नी रुसून बाहेर पडली. आईच्या पाठीमागे तिचा लहान मुलगा वन्स (वय ७) चालत होता. अचानक ऊसात लपलेला बिबट्या वन्सवर झडप घालतो, आणि त्याने मुलाची मान पकडून घेऊन जाऊ लागला. आईने हे पाहताच ओरडली, पण बिबट्या




वन्सला घेऊन ऊसात जवळजवळ आर्धा किलोमीटरपर्यंत गेला.

या घटनेच्या वेळी तिथे उपस्थित कामगार, ऊसतोड कामगार आणि इतर लोक तात्काळ जमा झाले. रात्री ९:४५ च्या सुमारास घडलेल्या या घटनेची माहिती पोलिस व वनविभागाला देण्यात आली.बिबट्याने घेतलेल्या वन्सला काही वेळातच शोधण्यात आले, पण त्याला दवाखान्यात घेऊन जाताना त्याच्या मृत्यूची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाचे अधिकारी व ग्रामस्थांनी बैठक घेतली. बिबट्याला पकडण्यासाठी पथकांनी सीसीटीव्ही लावले, आणि काही ठिकाणी पिंजरेही लावण्यात आले. गावातील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे की, हिरवळ शेतीचा भाग असल्याने, जर असे घडत असेल तर त्यांना काम करणे शक्य होणार नाही. त्यामुळे त्यांनी अधिक सुरक्षा व उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077